# MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

**Phone : 4010437 / 4014701 / 4020781**
**Fax : 4024068 / 4023516**
**Website : http://mpcb.mah.nic.in.**
**E-Mail : ast@mpcb.gov.in**

**KALPATARU POINT, 3rd Floor, Sion-Matunga Scheme Road No.8, Opp. Sion Circle, Sion (East) Mumbai-400 022.**

No. MPCB/AS(T)/TB/B- 4453

Date : 15/11/2016.

## CIRCULAR

**Sub: Implementation of Gazette Notification dtd. 07/11/2016 regarding 'Guidelines for Ready Mix Plant (RMC) for siting criteria of RMC Plant in the State of Maharashtra'.**

**Ref.:** 1) RMC Gazette Notification dtd. 07/11/2016.

...............

This has reference with Gazette Notification dtd. 07/11/2016 regarding 'Guidelines for Ready Mix Plant (RMC) for siting criteria of RMC Plant in the State of Maharashtra'. This Gazette Notification is uploaded on the website of MPCB and Govt. Printing Press.

The above notified guidelines are enforced for establishment and operation of Ready Mix Plant (RMC) in the State of Maharashtra.

All Regional Officers and Sub-Regional Officers are hereby directed to ensure implementation of the above referred Notified guidelines for establishment and operation of Ready Mix Plant (RMC) in the State of Maharashtra.

**(Dr. P. Anbalagan, IAS)**
**Member Secretary**

**Copy to:**

1) A.S.(Tech.)/ P.S.O./ J.D.(APC)/ J.D.(WPC)/ R.O.(HQ), M.P.C. Board, Mumbai.
2) All ROs/ SROs
   -You are all instructed to ensure effective implementation of the above referred Notified guidelines for establishment and operation of Ready Mix Plant in their jurisdiction.

RNI No. MAHBIL/2009/35526

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-क

वर्ष २, अंक ३२] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १०-१६, २०१६/कार्तिक १९-२५, शके १९३८ [पृष्ठे ९

[ किंमत : रुपये ६.०० ]

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हा दंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांचे कार्यालय**

रॉयल इन्शुरन्स इमारत, ५वा मजला, १४, जमशेटजी टाटा रोड, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०, दिनांक २७ ऑक्टोबर २०१६.

**वाचा.—** (१) क्रमांक निशि/केरो/२०१६/प्र.क्र.३४/सहा/जा. ४१६, दिनांक १४ ऑक्टोबर २०१६.
(२) केंद्र शासनाचे दिनांक ३० जून २०१६ चे पत्र.
(३) शासन पत्र क्रमांक रॉकेल. २०१५/प्र.क्र. २२६/नापु-२७, दिनांक ३० जुलै २०१६.
(४) केंद्र शासनाचे दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजीचे पत्र.
(४) शासन पत्र क्रमांक रॉकेल. २०१५/प्र.क्र. २२६/नापु-२७, दिनांक ५ ऑक्टोबर २०१६.
(५) दि केरोसीन (रेस्ट्रीक्शन ऑन युज अ‍ॅण्ड फिक्शेशन ऑफ सिलिंग प्राईस) ऑर्डर, १९९३.

### अधिसूचना

क्रमांक निशि/केरो/२०१६/प्र.क्र.३४/सहा/जा-४३६.— ज्याअर्थी, केंद्र शासनाने दिनांक १ जुलै २०१६ पासून पुढील सलग १० महिने प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस अनुदानित केरोसीनचे किरकोळ विक्री दर प्रति लिटर २५ पैसे याप्रमाणे वाढ (मूल्यवर्धित कराव्यतिरिक्त) करून निश्चित करण्याबाबत दिनांक ३० जून २०१६ चे पत्रान्वये राज्य शासनास कळविले होते.

केंद्र शासनाच्या सदर पत्रानुसार दिनांक १ जुलै २०१६ पासून पुढील सलग १० महिने प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस शिधावाटप क्षेत्रात केरोसीनच्या एक्स डेपो दरात प्रति लिटर २५ पैसे याप्रमाणे प्रति कि. लि. रुपये २५० (अधिक मूल्यवर्धित कर) इतकी वाढ करून अनुदानित केरोसीनचे किरकोळ विक्री दर निश्चित करण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत राज्य शासनाने संदर्भ क्रमांक ३ अन्वये कळविले होते.

तथापि, आता केंद्र शासनाने दिनांक १ सप्टेंबर २०१६ ते ३१ जानेवारी २०१७ या कालावधीत प्रत्येक महिन्याच्या प्रत्येक पंधरवाड्यानंतर (दर महिन्याच्या १ व १६ तारखेस) अनुदानित केरोसीनच्या किरकोळ विक्री दरात प्रति लिटर २५ पैसे (अधिक मूल्यवर्धित कर) इतकी तर दिनांक १ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रति लिटर २३ पैसे (अधिक मूल्यवर्धित कर) इतकी वाढ करून अनुदानित केरोसीनचे किरकोळ विक्री दर निश्चित करण्याबाबत संदर्भ क्र. ४ चे पत्रान्वये राज्य शासनास कळविले आहे.

राज्य शासनाने केरोसीनचे सुधारित एक्स डेपो रेट विचारात घेऊन प्रत्येक महिन्याच्या १ व १६ तारखेस अनुदानित केरोसीनचे किरकोळ दर निश्चितीची पुढील कार्यवाही करण्याबाबत संदर्भ क्र. ५ अन्वये पत्र देऊन कळविले आहे.

त्याअर्थी, वाचा क्रमांक ६ मध्ये नमूद आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, अविनाश सुभेदार, नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मुंबई शहर शिधावाटप क्षेत्रातील (मुंबई शहर व मुंबई उपनगर) केरोसीनच्या घरगुती वापराचे घाऊक व किरकोळ विक्रीचे दर दिनांक १ नोव्हेंबर २०१६ पासून पुढील आदेश होईपर्यंत तात्काळ अंमलात आणणेकरिता पुढीलप्रमाणे अधिसूचित करीत आहे :—

| अनुक्रमांक | बाब | सध्याचा दर (रुपये प्रति कि.लि.) | सुधारित दर (रुपये प्रति कि.लि.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| **ए** | एक्सडेपो दर (रुपये प्रति कि.लि.) | १४,८०४.०० | १५,०५४.०० |
| **बी** | व्हॅट @ ३ % | ४४४.१२ | ४५१.६२ |
| **सी** | घाऊक विक्रेत्यासाठी एकूण खरेदी किंमत (ए + बी) | १५,२४८.१२ | १५,५०५.६२ |
| **डी** | (*i*) घाऊक विक्रेत्याचे कमिशन | ७१४.१८ | ७१४.१८ |
| | (*ii*) तापमान बदलामुळे येणाऱ्या घटीच्या व हाताळणूक तुटीच्या प्रतिपूर्तीसाठी असाधारण भत्ता. | ९९.०० | ९९.०० |
| | (*iii*) वाहतूक खर्च | २८०.७९ | २८०.७९ |
| | (*iv*) पथकर (Toll Tax) | ७०.०० | ७०.०० |
| | (*v*) घाऊक वितरकांना पूर्णांकाचा लाभ | ९.२१ | १.९३ |
| | (*vi*) एकूण किंमत वाढ [डी (i) + डी (ii) + डी (iii) + डी (iv) + डी (v)] | १,१७३.१८ | १,१६५.९० |
| **इ** | एकूण किंमत वाढीवर, व्हॅट @ ३ % [डी (vi) च्या ३ %] | ३५.२० | ३४.९८ |
| **एफ** | एकूण [सी + डी (vi) + इ] घाऊक विक्रीचा दर | १६,४५६.५० | १६,७०६.५० |
| **एफ १** | किरकोळ विक्रेत्यासाठी खरेदी किंमत | १६,४५६.५०** (किंमत रुपये १५,९७७.१८ + मूल्यवर्धित कर रुपये ४७९.३२) | १६.७०६.५०** (किंमत रुपये १६,२१९.९० + मूल्यवर्धित कर रुपये ४८६.६०) |
| **जी** | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटीच्या लाभांसह) | ४५०.०० | ४५०.०० |
| **एच** | किरकोळ विक्रेत्याचे कमिशन (तुटींच्या लाभांसह) वर ३ % व्हॅट [जी च्या ३ %] | १३.५० | १३.५० |
| **आय** | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति किलो लिटर) | १६,९200.00** (किंमत रुपये १६,४२७.१८ + मूल्यवर्धित कर रुपये ४९२.८२) | १७,१७६०.००** (किंमत रुपये १६,६६९.९० + मूल्यवर्धित कर रुपये ५००.१०) |
| **जे** | किरकोळ विक्री दर (रुपये प्रति लिटर) | १६.९२ | १७.१७ |

शासन परिपत्रक क्रमांक अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, क्रमांक केईआर-१३७६/३७६९/सतरा, दिनांक १७ डिसेंबर १९७६ नुसार पूर्णांकाचा लाभ एकाच पातळीवर (घाऊक वितरक) घाऊक दरामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

**अविनाश सुभेदार,**
नियंत्रक,
शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

### " महाराष्ट्र राज्यातील रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांकरिता मार्गदर्शक तत्वांची नियमावली "

### अधिसूचना

क्र. मप्रनि/ सस(तां)/ तांशा/ ब-४३६३.—हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ च्या कलम १७ उप कलम (१) आणि खंड (बी) व खंड (एच) आणि कलम ५४ मधील उप कलम (१) आणि उप कलम (२) मधील खंड (झेड) व जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम १७ उप कलम (१) मधील खंड (एन) व (ओ) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य सरकारने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत सल्लामसलत करून महाराष्ट्र राज्यातील रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांकरिता मार्गदर्शक तत्वांची एक नियमावली तयार केली आहे. त्यानुसार रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांना पर्यावरणीय मानकांचे पालन करणे अनिवार्य करण्यात आले असून प्रदुषणास आळा घालण्याकरिता/तीव्रता कमी करण्याकरिता आणि जनतेच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी त्यांच्यावर अतिरिक्त नियंत्रणेही घालण्यात आली आहेत.

**व्याख्या :**

**१ रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) :** असे काँक्रीट जे कारखान्यात किंवा बॅचिंग प्लान्टमध्ये मागणीनुसार तयार केले जाते व नंतर ते ट्रान्झिट मिक्सर असलेल्या ट्रकमधून बांधकाम प्रकल्पावर पाठविण्यात येते.

**२ व्यावसायिक प्रकल्पः** बांधकामाकरिता रेडी मिक्स काँक्रीटची गरज असलेल्या ग्राहकांना पुरवठा करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेला रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प.

**३ कॅप्टीव्ह प्लान्ट : एखाद्या समर्पित** बांधकाम प्रकल्पास रेडी मिक्स काँक्रीट पुरवठा करण्याच्या एकमेव उद्देशाने प्रकल्प परिसरात स्थापन करण्यात आलेला रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प.

**अ. उपयोज्यता :**

१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संमतीपत्र व्यवस्थापन कार्यप्रणालीनुसार रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पांना मंडळाचे संमतीपत्र आवश्यक आहे.

२ परवानगी/ना हरकत प्रमाणपत्र संबंधित स्थानिक संस्थेद्वारा/नियोजन प्राधिकरणाद्वारे दिले जाते.

**ब. स्थान निश्चयनाबाबतचे निकष :**

रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प उभारतांना खालील स्थाननिश्चयनाबाबतचे निकष ग्राह्य धरले जावेत.

१ व्यावसायिक रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्पाकरिता १००० किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या वस्तीपासून आणि प्रमुख रस्त्यापासून (जसे की – राष्ट्रीय/ राज्य महामार्ग, मोठे जिल्हा मार्ग, शहरातून जाणारे प्रमुख रस्ते) अंदाजे १०० मीटरचे अंतर संरक्षित क्षेत्र (buffer zone) म्हणून राखले जावे.

२ विशिष्ठ बांधकाम प्रकल्पाकरिता उभारण्यात आलेला कॅप्टीव्ह आरएमसी प्रकल्प हा बांधकाम प्रकल्प परिसरात असावा.

३ व्यावसायिक रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्रकल्प शाळा, महाविद्यालये, रुग्णालये तसेच न्यायालय, इ.पासून किमान २०० मी.च्या अंतरामध्ये नसावेत.

४ म.प्र.नि.मंडळाकडून उद्योग स्थापन करण्याचे संमतीपत्र घेतांना प्रकल्प प्रवर्तकाने इतर वैधानिक परवाने जसे- डीसी नियम, इ. ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

**क. पर्यावरणीय मुल्यांकन :**

प्रकल्पाचे पर्यावरणीय मुल्यांकन करतांना खालील घटकांचा विचार व्हावा :—

१ कच्च्या मालाची जसे की, वाळू, खडी, सिमेंट, फ्लाय ॲश व इतर मिश्रीत घटकांची साठवण क्षमता व व्यवस्था याबाबत उल्लेख असावा.

२ प्रकल्पाच्या ठिकाणी उत्पादन प्रक्रिया, तसेच कच्चा माल हाताळणी यामधून उत्सर्जित होणाऱ्या धुलिकणांचे नियंत्रण करण्यासाठी योग्य ती यंत्रणा बसवितांना हवामानाचा विशेषतः वाऱ्याच्या दिशेचा अभ्यास करण्यात यावा.

**ड. प्रदूषण नियंत्रण उपाययोजना**

**अ. हवा प्रदूषण नियंत्रण**

**I. अंतर्गत उपाययोजना :**

१ साहित्याची हाताळणी तथा वहन करणाऱ्या सर्व जागा आच्छादित करण्यात याव्यात.

२ धुळीवर नियंत्रण करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :—

- प्रकल्पाच्या चारही बाजुस किमान २० फूट ऊंचीचे किंवा ज्या ठिकाणाहून साहित्याच्या हाताळणमुळे हवा प्रदूषण उत्सर्जन होणार आहे, त्या ठिकाणापेक्षा ५ फूट ऊंच, यापैकी जे जास्त ऊंचीचे असेल, असे योग्य त्या साहित्याचे कुंपण घालण्यात यावे. आवश्यकता भासल्यास सदर कुंपणाची ऊंची नेटलॉनच्या कापडाने वाढवावी.
- रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्प परिसरात कुंपणालगत पाणी फवारणी/तसेच रासायनिक धुलिकण स्थिरीकरण यंत्रणा उभारण्यात यावी.
- रेडी मिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्रकल्पाच्या परिसरात कुंपणाच्या बाजुने किमान ५ मीटर पट्टयामध्ये वृक्षरोपण करण्यात यावे. यासाठी २० मीटर ऊंचीपर्यंत झाडांच्या पानांचे आच्छादन होईल, अशा वृक्षांची लागवड करण्यात यावी.

३ प्रकल्पाचा आंतरभाग सिमेंट कॉंक्रीट किंवा डांबराने आच्छादित असावा.

४ प्रकल्पाच्या आंतर भागात जमा झालेली धूळ (कोरडी/ओली) औद्योगिक व्हॅक्युम क्लिनरच्या साहाय्याने नियमितपणे साफ करावी.

५ ट्रान्झिट मिक्सर असलेल्या ट्रकची चाके धुण्याकरिता विस्तरीय स्वरुपाची म्हणजे प्रकल्पाचे प्रवेशद्वार व बाहेर जाणाऱ्या मार्गावर व्यवस्था करण्यात यावी.

**II. कच्च्या मालाची हाताळणी आणि साठवणः**

१ सिमेंट व फ्लाय ॲश यांची साठवणूक करण्याकरिता उभारण्यात आलेल्या कोठारांना (सायलोज) योग्य त्या क्षमतेची धुलिकण जमा करणारी यंत्रणा जसे की–मल्टी सायक्लोनसह बॅग हाऊस यंत्रणा बसविण्यात यावी.

२ खडी, वाळू, सिमेंट व फ्लाय ॲश यांची हाताळणी बंदिस्त यांत्रिक प्रणालीमार्फत करावी.

३ मनुष्यबळामार्फत करण्यात येणारी कार्ये बंदिस्त छताखाली अनुज्ञेय असतील. तसेच त्या ठिकाणी मालाची हाताळणी करण्याच्या जागेवर धुळ नियंत्रण यंत्रणा व छतावर दुय्यम धुलिकण नियंत्रण यंत्रणा असावी.

४ वाळू आणि खडीचे वहन करणारे पट्टे पत्र्यांनी बंदिस्त असावेत. तसेच सर्व ट्रान्सफर पॉईंटवर दुय्यम उत्सर्ग टाळण्याकरिता धुलिकण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात यावी.

५ सिमेंट, खडी आणि वाळू यांचे मिश्रण करणाऱ्या विभागातील धुळीचे नियंत्रण करण्यासाठी योग्य त्या क्षमतेची मल्टी सायक्लोनसह बॅग हाऊस असलेली धुळ जमा करणारी यंत्रणा असावी.

६ वाळू आणि खडी यांची साठवणूक केलेल्या ठिकाणी छतावर पाणी फवारणी यंत्रणा असावी.

७ रेडीमिक्स कॉंक्रीट उत्पादन प्रक्रिया व हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा एकमेकांशी संलग्न असावेत.

८ विद्युत पुरवठा करणाऱ्या प्रर्यायी प्रणालीतून उत्पादन प्रक्रिया व वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा यांना प्रामुख्याने विद्युत पुरवठा करण्यात यावा.

**III.** वातावरणातील हवेची गुणवत्ता खालील दिलेल्या मानकांच्या मर्यादेत राखण्यासाठी प्रकल्पधारकाने प्रकल्पाच्या कुंपणाजवळ नियमितपणे मोजण्यात यावी. (सरासरी २४ तास)

| | | |
|---|---|---|
| धुलिकण $PM_{10}$ | पेक्षा जास्त नसावे | १०० $\mu g/m^3$ |
| धुलिकण $PM_{2.5}$ | पेक्षा जास्त नसावे | ६० $\mu g/m^3$ |

१. कमर्शिअल (व्यावसायिक) रेडमिक्स कॉंक्रीट प्लान्ट धारकांनी त्यांच्या हद्दीमध्ये सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचे सतत मोजमाप करणारी यंत्रणा बसवावी(CAAQM)लावावे.

२. कॅप्टीव रेडमिक्स कॉंक्रीट प्लान्टधारकांनी आठवड्यातून दोन वेळा २४ तासांचे सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचे मोजमाप (AAQM) करावे.

**ब. जल प्रदूषण नियंत्रण परिमाणे :**

१. बॅचिंग प्लान्ट वॉशिंग, ट्रान्झिट मिक्स्चर वॉशिंग. व्हेईकल टायर वॉशिंग आणि फ्लोअर वॉशिंग यातून निर्माण झालेले सांडपाणी योग्य अशा ड्रेनेज सिस्टीममधून जमा केले जावे. त्यावर विल्हेवाटीसाठी खालील दिलेल्या मानकांप्रमाणे पूर्तता करू शकेल, अशा सर्वंकष सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेमध्ये प्रक्रिया केली जावी.

| अ.क्र. (१) | मानके (२) | परिमाण (३) | मर्यादा (४) |
|---|---|---|---|
| १ | सामू (pH) | | ५.५ ते ९.० |
| २ | तेल आणि वंगण | पेक्षा जास्त नसावा | १० मि.ग्रॅ./ लि. |
| ३ | तरंगणारे घन कण | पेक्षा जास्त नसावा | १०० मि.ग्रॅ./ लि. |
| ४ | बीओडी ३ दिवस | पेक्षा जास्त नसावा | ३० मि.ग्रॅ./ लि. |
| ५ | सीओडी | पेक्षा जास्त नसावा | १५० मि.ग्रॅ./ लि. |
| ६ | टीडीएस | पेक्षा जास्त नसावा | २१०० मि.ग्रॅ./ लि. |

२. प्रक्रिया केलेले सांडपाणी फक्त प्रकल्पातील प्रक्रियेमध्ये, वॉटर स्प्रिकलिंग सिस्टीममध्ये किंवा बागकाम / वृक्षरोपणासाठी वापरण्यात यावे. प्रकल्पातून सांडपाणी कोठेही बाहेर सोडण्यात येऊ नये.

**क. ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या उपाययोजना :**

रेडीमिक्स प्लांट प्रकल्पधारकाने प्रकल्पाच्या परिसरामध्ये ध्वनी प्रदूषण नियंत्रणामध्ये ठेवण्यासाठी ध्वनी (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील तरतुदींनुसार उपाययोजना कराव्यात.

**ड. घनकचऱ्यावरील प्रक्रिया आणि विल्हेवाट :**

ट्रान्झिट मिक्स्चर वॉशिंगमधून तयार झालेला घनकचरा आरएमसी प्रकल्पातून तयार झालेल्या टाकाऊ पदार्थ (कचरा/ गाळ) यांचा रिकव्हरी युनिट/ रिक्लेमिंग सिस्टीच्या माध्यमातून पुनर्वापर करण्यात यावा किंवा त्यांची स्थानिक प्रशासनाने बांधकामातून तयार झालेल्या कचऱ्याकरिता नेमून दिलेल्या जागी विल्हेवाट लावण्यात यावी.

**ई. म.प्र.नि.मंडळाने संमतीपत्रामध्ये खालील अटींचा समावेश करावा :**

१. प्रकल्पप्रवर्तकाने प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रकिया करण्याकरिता आवश्यक क्षमतेची सयंत्रणा व विल्हेवाट सुविधा पुरवाव्यात. तसेच जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत तरतुदींचे पालन करावे.

२. प्रकल्पप्रवर्तकाने वायुउत्सर्जनाच्या स्त्रोताजवळ पुरेशा स्वरुपाची हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविणे, तसेच हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अंतर्गत तरतुदींचे पालन करावे.

३. सांडपाणी व उत्सर्जित हवा यातील प्रदुषके प्रमाणापेक्षा जास्त उत्सर्जन झाल्यामुळे सभोवतालच्या कोणत्याही पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास व संमतीपत्रातील अटींचे उल्लंघन झाल्यास त्यावरील उपाय व पुर्नस्थापना करण्याची जबाबदारी पुर्णतः प्रकल्पप्रवर्तकाची असेल.

**संकीर्ण :**

१ अस्तित्वातील आरएमसी प्रकल्प, जे नियमांचे पालन करत नाहीत व जे जुन्या पद्धती (Star Type) ने उभारण्यात आलेले आहेत, अशा प्रकल्पधारकांनी आपले आरएमसी प्रकल्प एक वर्षाच्या आत मोडीत काढावे. तसेच अस्तित्वात असणारी इतर आरएमसी प्लान्ट धारकांनी उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी एका वर्षाच्या कालावधीमध्ये करावी. ज्या आरएमसी प्लान्टधारकांकडे म.प्र.नि.मंडळाचे वैध संमतीपत्र आहे, त्यांचे संमतीपत्र एक वर्षाच्या आत उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वानुसार सुधारित करून घ्यावे.

२ आरएमसी प्लान्ट फक्त दिवसा चालविण्यात यावेत. दिवसाची वेळ सकाळी ०६:०० ते रात्रौ १०:०० अशी विचारात घेण्यात यावी. अधिसुचित औद्योगिक क्षेत्र आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाहेरील आरएमसी प्लान्ट यांना सदरची अट बंधनकारक नाही.

३ आरएमसी / बॅचिंग प्रकल्पाकरिता म.प्र.नि.मंडळ अधिक कडक निकष लागू करू शकते.

४ स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण आरएमसी प्लान्ट धारकांच्या समुहासाठी स्थान निश्चित करू शकतात.

सदर अधिसूचना मा.अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**डॉ. पी. अन्बलगन,** भा.प्र.से.
सदस्य सचिव

दिनांक ७ नोव्हेंबर २०१६.

## MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD, MUMBAI

## The Guidelines for Ready Mix Concrete Plant (RMC) for sitting criteria of RMC Plant in the State of Maharashtra

*NOTIFICATION*

No. MPCB/AS(T)/TB/B-4363.—In exercise of the powers conferred under sub-section (*1*) of section 54 read with clause (z) of sub-section (*2*) of the said section and sub-section (*1*) Sub clause (b) & (h) of section 17 of the Air (Prevention & Control of Pollution) Act, 1981 & Sub Section (*1*), Sub Clause (n) and (o) of 17 of the Water (Prevention & Control of Pollution) Act, 1974, the State Govt. after consultation with the Maharashtra Pollution Control Board hereby notifies the Guidelines for Ready Mix Concrete Plant (RMC) for sitting criteria of RMC's in the state of Maharashtra, the Environmental norms to be imposed on RMCs for additional control measures to be imposed to abate/mitigate pollution, to protect public health in the surrounding areas.

*DEFINITION :*

**(i) Ready Mix Concrete (RMC)** : Ready-mix concrete is concrete that is manufactured in a factory or batching plant, according to a set recipe, and then delivered to a work site, by truck mounted in–transit mixers.

**(ii) Commercial Plant :** A concrete batching plant set up for the purpose of supply of RMC to customers who require this for their construction.

**(iii) Captive Plant :** A Concrete Batching Plant which has been set up by RMC manufacturer or contractor or any other for the sole purpose to supply RMC to a dedicated project site.

**A. APPLICABILITY -**

(i) The RMC Plants are covered under the consent management regime of the Maharashtra Pollution Control Board.

(ii) The permissions / grant of NOC shall be issued by the concerned local body/appropriate planning authority.

**B. SITTING CRITERIA-**

The following sitting criteria shall be considered for establishment of RMC Plant.

1. For commercial plant a buffer zone of approximately 100 m distance from human habitation of 1000 souls or more and major road (National/ State Highway, MDRs, main roads in city areas) shall be maintained.
2. For captive plant for the specific project, the location of RMC can be inside the project premises.
3. Commercial RMC plant should not be located within 200 m from schools, colleges, hospitals and courts.
4. The project proponent should comply with other locational statutory requirements in force such as DC Rules etc., while obtaining Consent to Establish from the Maharashtra Pollution Control Board.

**C. ENVIRONMENTAL ASSESSMENT** :

The following factors shall be taken into consideration for environmental assessment.

(i) The Material handled *viz.* sand, aggregates, fly ash, cement and additives and their Storage arrangements along with capacity shall be specified.

(ii) To carry out meteorological study specifically wind directions and accordingly prepare plan to control of fugitive emissions / dust particles and suppression system.

**D. Pollution control measures:**

**(a) Air Pollution Control :**

**(i) In-house measures ;**

1. All material transfer points should be covered.
2. The dust containment system shall be provided incorporating either of the following

- Barricading all around the periphery of the plot boundary with height of minimum 20 feet or 5 feet above free fall air emission area, whichever is higher with appropriate material. Same may extend above with netlon clothing whenever required.
- Water sprinkling/Chemical dust stabilizing agent spraying system along the periphery inside the premises of RMC.
- Tree plantation along the periphery inside boundary of the RMC premises having minimum width of 5 meters, on all sides. The foliage of the trees shall adequately cover area up to about 20m height.

3. Internal work area shall be, cement concreted/Asphalted.
4. Daily cleaning / Removal of dust accumulation inside the plant (dry/wet) shall be carry out, with industrial vacuum cleaner.
5. Two level tyre washing facility shall be provided at entry and exit points, for transit mixture vehicle.

**(ii) Raw material storage & handling ;**

1. Storage silos of cement & fly-ash shall be equipped with adequate capacity of dust Collection system such as multi- cyclone followed by bag house assembly.
2. Handling of Cement, sand, fly ash and aggregates shall be carried out with mechanical closed system only.
3. Manual operations shall be permitted only in a closed shed, equipped with dust control system at the loading point as well as roof top secondary dust control system.
4. All Conveyor belts of Sand, aggregate shall be covered with tin sheets and at transfer points dust collection system to be installed to avoid secondary fugitive emissions.
5. Mixing section of cement, aggregate & sand shall be equipped with adequate capacity dust collection system, such as multi-cyclone followed by bag house, so as to limit dust emissions.
6. Storage area of sand & aggregate shall be equipped with roof top water sprinkler system.
7. The operation of the plant shall be interlocked with air pollution control devices.
8. Alternative power supply system, should cover both the production and Air pollution control system.

(iii) The unit shall monitor ambient air quality at the plot boundary and meet the following ambient air quality standards (24 hours Average)

| | | | |
|---|---|---|---|
| Particulate Matter PM 10 | Not to Exceed | 100 | µg/m$^3$ |
| Particulate Matter PM 2.5 | Not to Exceed | 60 | µg/m$^3$ |

(*a*) Commercial plants shall install continuous ambient air quality monitoring station (CAAQMS) within the premises.

(*b*) Captive plant shall carry out ambient air quality monitoring twice in a week for 24 hours.

**(b) Water pollution control measures;**

**(I)** The waste water generated from the sources like Batching Plant washing, Transit Mixer washing, Vehicle tyre washing and floor washing area shall be collected through well designed drainage system in a collection tank and the same shall be treated by providing comprehensive treatment system as is warranted to meet the disposal standards mentioned below.

**Standards of the treated effluent Quality**

| Sr. No. (1) | Parameter (2) | Concentration (3) | Limits (4) |
|---|---|---|---|
| 1 | pH | Between | 5.5 to 9.0 |
| 2 | Oil & Grease | Not to exceed | 10 mg/l |
| 3 | Suspended Solids | Not to exceed | 100 mg/l. |
| 4 | BOD-3 days | Not to exceed | 30 mg/l. |
| 5 | COD | Not to exceed | 150 mg/l. |
| 6 | TDS | Not to exceed | 2100 mg/l |

**(II)** The treated effluent shall be reused in the process, water sprinkling system or gardening / plantation only. There should not any discharge of effluent from the plant.

**(c) Noise pollution Control Measures :**

Ready mix concrete industry shall comply with the provisions under the Noise pollution (Regulation and Control) Rule 2000, to control Noise Pollution.

**(d) Solid waste treatment and disposal ;**

Solid waste from transit mixture washing, muck (debris/sludge) generated from RMC shall either be reused through recovery unit/ Reclaiming system OR disposed off at a designated approved site by local body, for debris / construction waste.

**E. <u>The following conditions shall be incorporated in the consent :</u>**

1. The authority shall provide adequate water treatment and disposal facility for generated effluent from their activity .They shall comply with provisions under the Water (Prevention and Control of Pollution) Act, 1974.

2. The authority shall provide adequate Air pollution control arrangement at the source. They shall comply with the provisions under the Air (Prevention and Control of Pollution) Act, 1981 and conditions prescribed.

3. The remediation and restoration measure shall be taken by the project proponent in case of any environmental pollution in the surrounding area due to emission/effluent in excess of the standards being discharged/emitted in to the environment and violation of consent conditions and thereby causing environmental pollution.

**Miscellaneous :**

1. The RMC plants where the norms are not followed and the technology is old (Star type) shall be discarded within 1 year. Existing RMC plant shall implement the suggested guidelines within a year. The renewal of Maharashtra Pollution Control Board's consent shall be considered only after implementation of new guidelines. The RMC's having valid consent of Maharashtra Pollution Control Board shall amend their consent in compliance with guideline within a year.

2. Operation of RMC plant shall be in day time only. However in notified MIDC area, notified industrial parks, outside corporation area timing are not applicable. The Day time shall mean from 6 a.m. to 10 p.m.

3. The Maharashtra Pollution Control Board may make the standards stringent for the RMC / batching plants.

4. Urban local bodies/ special planning authority can locate all such RMC plants in cluster.

This notification is issued with the approval of Hon'ble Chairman of the Board.

Dr. P. ANBALAGAN,
dated 7th November 2016. IAS, Member Secretary.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.